# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२०

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**अंतिम सत्र/अंतिम वर्षाच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ७ नोव्हेंबर, २०२० रोजी ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने झालेल्या परीक्षांच्या निकालासंदर्भात विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीसंदर्भात.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ७ नोव्हेंबर, २०२० रोजी ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने संपन्न झालेल्या आहेत. बहुतांश परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत. सदर निकालासंदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्याचे विश्लेषण करुन व तक्रारीसंदर्भात तथ्यता पडताळून सदर तक्रारींचे निवारण करणेसंदर्भातील कार्यवाही परीक्षा विभागाने सुरु केलेली आहे.

सदर तक्रारींचे विश्लेषण केले असता पुढील ठळक बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. जसे आवेदनपत्रातील विषय व विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रत्यक्ष परीक्षा यांमधील तफावत, दोन वेगवेगळे ई-मेल आयडीचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणे, तांत्रिक कारणांमुळे ऑनलाईन परीक्षांमध्ये व्यत्यय येऊन परीक्षा पूर्ण न होणे, इत्यादी. या सर्व बाबींचा व विद्यार्थ्यांची संख्या यांचा विचार करता विद्यापीठ परीक्षा विभागामार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या तक्रारींबाबतचा अंतिम निर्णय दिनांक ३ डिसेंबर, २०२० पर्यंत कळविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. सदर तक्रारींचे निवारण/पडताळणी अंती ज्या विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये बदल/सुधारणा असल्यास त्यांचे सुधारीत निकाल results.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ